जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
सकाळ 4 JUL 2016

बदल्या करा, असा सूर आता मावळला

कुलसचिव नियुक्ती प्रतीक्षा; सेवक संघाची सावध भूमिका

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठातील विविध ठिकाणच्या कुलसचिव पदावरील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करा, हा सूर मावळू लागला आहे. पूर्वीच्या कुलसचिव मिलिंद भालेराव बदल्या होऊ देत, असा पवित्रा घेताना जात आहे.

शिवाजी विद्यापीठ सेवक संघाने बदल्यांबाबतची आपली भूमिका मांडली होती. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एस. शिंदे यांनाच्या त्यांची तशी मागणी करत आंदोलनाचा इशारा दिला होता. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बदल्या कार्यवाहीसाठी हालचाल सुरू केली होती. प्रभारी कुलसचिव, परीक्षा नियंत्रक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक, वित्त व लेखाधिकारी यांची बैठक होऊन त्याबाबतचा निर्णय व्हावा, अशी त्यांची अपेक्षा होती. तसेच राजर्षी शाहू जयंतीनंतर बदल्यांचा प्रश्न मार्गी लागेल, अशी त्यांनी दिली होती. त्यामुळे काहीच बदल्या होतील, असा अंदाज व्यक्तीला वाटा होता. मात्र, कुलसचिव व वित्त व लेखाधिकारी हे पद प्रभारी आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या बदल्या कितपत उपयुक्त ठरतील, असा पवित्रा घेतला जात आहे.

पात्रताही अधिसंघटना विद्यापीठ कामगार पात्र होईल आणि ऑफिसपण्ये विद्यापीठाला पूर्णवेळ कुलसचिव मिळेल. त्यानंतर नेत्र त्यांच्या मार्गदर्शनाखाली बदल्या होणे संयुक्तिक ठरेल, असे विद्यापीठ कर्मचारीतील काही घटकांचे म्हणणे आहे. असता बदल्या झालाच, तर एखाद्या विभागातील काहीतरी घडी मोडायला नको, असे काही घटकांना वाटत आहे.

नियोक्ते, अधीक्षक, महाव्यवस्थापक कुलसचिव व उपकुलसचिव पदांवरील व्यवस्थापन असता बदल्या झालाच तरीत कर्मचारी त्यांच्या बदल्या करायला लागणार आहेत. त्यामुळे नुसता कुलसचिवांच्या बदल्यांचा अधिकार दिला तर ते सोईचे होईल, अशी चर्चा होत आहे. त्यामुळे बदल्यांच्या मागणीसाठी इतके दिवस थांबणे आता आपलाही दिवस थांबावे म्हणून काही विभागात नाही. असाच पवित्रा घेताना जात आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
पुढारी 4 JUL 2016

माजी कुलगुरू डॉ. कणबरकर कुटुंबीयांकडून ग्रंथसंपदा भेट

कोल्हापूर (प्रतिनिधी) : शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू कै. प्राचार्य डॉ. आर. के. कणबरकर यांच्या कुटुंबीयांकडून चार हजार पुस्तकांचा ग्रंथसंग्रह राजर्षी शाहू जयंती दिनाचे औचित्य साधून विद्यापीठास भेट देण्यात आला. डॉ. कणबरकर हे व्यासंगी शिक्षक होते. त्यांनी शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रातही कार्य केले आहे. कणबरकर कुटुंबीयांनी अभ्यास व संशोधनासाठी विद्यार्थ्यांना उपयोग व्हावा म्हणून ही ग्रंथसंपदा देणगी म्हणून दिली असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
लोकमत 4 JUL 2016

विद्यापीठ करणार मतदार जागृती

कोल्हापूर : राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार शिवाजी विद्यापीठ हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदार जागृती अभियान राबविणार आहे.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा यातिकाणी नवमतदार नोंदणी करण्याचा संकल्प केला आहे. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रकल्प कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत करवीरचे नायब तहसीलदार अविनाश निंबाळकर यांनी नवीन मतदार नोंदणी, नाव कमी करणे, नाव व पत्तामध्ये बदल झाला असल्यास एका केंद्रातून दुसऱ्या केंद्रात जाण्यासाठी भरावयाचे अर्ज क्रमांक सहा, सात आणि आठ याची माहिती दिली. विद्यापीठाचे नोडल अधिकारी डॉ. भगवान माने यांनी विद्यापीठ कार्यक्षेत्रात मतदार जनजागृती अभियानाची अंमलबजावणी कशी करावयाची आहे याची माहिती दिली. विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड यांनी हे अभियान राष्ट्रीय कर्तव्य समजून यात सहभागी होण्याचे आवाहन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
पुण्यनगरी 4 JUL 2016

विद्यापीठातर्फे मतदार जागृती अभियान

कोल्हापूर / प्रतिनिधी :

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदार जागृती अभियानाची मोहीम शिवाजी विद्यापीठाने घेतली आहे. राजर्षी शाहू सभागृहात राष्ट्रीय सेवा योजना प्रकल्प कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या बैठकीत करवीरचे नायब तहसीलदार अविनाश निंबाळकर यांनी नवीन मतदार नाव नोंदणी, मतदारसंघाच्या बाहेर जाण्यासाठी नाव कमी करणे, नाव आणि पत्ता यामध्ये बदल झाला असल्यास एका केंद्रातून दुसऱ्या केंद्रात जाण्यासाठी भरावयाचे फॉर्म नं. ६, ७ आणि ८ यासंबंधी माहिती दिली. डॉ. भगवान माने, नोडल अधिकारी, विद्यापीठ कार्यक्रमाची अंमलबजावणी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात करावयाची आहे.

जनसंपर्क कक्ष
लोकमत 4 JUL 2016 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याच्या प्रक्रियेचा प्रारंभ

अर्ज करण्याची मुदत

- तंत्रिका (दि. ३ जुलै) ते ३१ ऑगस्टपर्यंत : ५०० रुपये शुल्क
- दि. १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबरपर्यंत : ३५० रुपये विलंब शुल्क
- दि. १६ सप्टेंबर ते 30 सप्टेंबरपर्यंत : ८५० रुपये अतिविलंब शुल्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५३ वा दीक्षांत समारंभ साधारणपणे डिसेंबर २०१६ ते जानेवारी २०१७ दरम्यान होणार आहे. या समारंभात पदवी, पदविका प्रमाणपत्र मागणीसाठी अर्ज करण्याच्या प्रक्रियेचा प्रारंभ तंत्रिकापासून सुरू झाला.

ऑक्टोबर २०१५ आणि एप्रिल २०१६ आणि यापूर्वीच्या अंतिम परीक्षांमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांना पदवी, पदविका प्रमाणपत्र मिळविण्यासाठी ऑनलाईन अर्ज करावा लागणार आहे.

पदवी प्रमाणपत्र मागणीचा दीक्षांत अर्ज आणि सविस्तर माहिती विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी दिली. या संकेतस्थळावर पदवी प्रमाणपत्र मागणीचा दीक्षांत अर्ज ऑनलाईन भरून त्याची प्रत विद्यार्थ्यांनी घ्यावी. या अर्जासमवेत आयडेंटिटी आकाराचे एक छायाचित्र, सर्व वर्षांचा गुणतक्त्याच्या प्रमाणित प्रती जोडणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील दीक्षांत विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन काकडे यांनी केले आहे. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
महाराष्ट्र टाईम्स 4 JUL 2016 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

'दीक्षान्त'साठी अर्ज भरण्यास प्रारंभ

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ५३व्या दीक्षान्त समारंभाचे आयोजन डिसेंबर २०१६ ते जानेवारी २०१७ दरम्यान करण्यात येणार आहे. दीक्षान्त समारंभातून पदवी प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी तीन जुलैपासून विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे.

ऑक्टोबर २०१५ व एप्रिल २०१६ सत्रातील आणि त्यापूर्वीच्या पदवी व पदविका प्रमाणपत्र मिळवण्याकरिता विहित नमुन्यामध्ये ऑनलाइन अर्ज दाखल करावे लागणार आहेत. अर्जासोबत आयडेंटिटी साइज फोटो व सर्व वर्षाच्या गुणपत्रिका प्रमाणित प्रतीसोबत जोडाव्या लागणार असल्याचे परीक्षा विभागाने प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

प्रमाणपत्रासाठी ३ जुलै ते ३१ ऑगस्ट २०१६ अखेर २५० नियमित शुल्क आकारण्यात येणार आहे. १ ते १५ सप्टेंबरपर्यंत ३५० रुपये विलंब शुल्क आकारले जाणार आहे. १६ ते ३१ सप्टेंबरनंतर येणाऱ्या अर्जांना अतिविलंब शुल्क म्हणून ८५० रुपये आकारण्यात येणार आहे. अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी ई-मेल आयडी, मोबाइल क्रमांक आणि पूर्ण पत्ता लिहावा. विद्यार्थ्यांना दीक्षान्त समारंभाचे निमंत्रण व माहिती ई-मेल व एसएमएसद्वारे पाठविण्यात येणार आहे. अर्ज उपरोक्त दर्शविलेल्या मुदतीत विद्यापीठाकडे समक्ष सादर करावयाचा असल्यास वरील मुदतीप्रमाणे शुल्क विद्यापीठाच्या लेखा विभागामध्ये रोख स्वरूपात जमा करुन अर्ज पावतीसह दीक्षान्त विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. अर्ज पोस्टाने अथवा कुरिअरने पाठवायचा असल्यास शुल्काचा डिमांड ड्राफ्ट व अर्ज सादर करणे गरजेचे आहे. ड्राफ्टच्या मागील बाजूस विद्यार्थ्यांनी पूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक व अर्जाचा क्रमांक नमूद करण्याची आवश्यकता आहे. अर्ज पोस्ट व कुरिअरद्वारे विद्यापीठास सादर करता येतील, असे परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी कळविले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
पुढारी 4 JUL 2016

अभिलेखांचे जतन गरजेचे

डॉ. भास्कर धाटावकर यांचे प्रतिपादन

कोल्हापूर : प्रतिनिधी

राष्ट्राच्या इतिहासाची निर्मिती ही अभिलेखांच्या माध्यमातून होत असते. त्यामुळे अभिलेखांचे जतन ही इतिहासाच्या दृष्टीने अतिमहत्त्वाची गरज असल्याचे प्रतिपादन राज्य शासनाच्या पुराभिलेखागाराचे संचालक डॉ. भास्कर धाटावकर यांनी केले. कोल्हापूर हे महाराष्ट्राच्या इतिहासाचे संशोधन केंद्र बनत असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय संचलित व नॅशनल मिशन फॉर मॅन्युस्क्रीप्ट संलग्नित मॅन्युस्क्रिप्ट रिसोर्स सेंटर यांच्या वतीने तत्त्वशास्त्र मालिकेअंतर्गत आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत 'राष्ट्रीय इतिहासामध्ये अभिलेखाचे महत्त्व' या विषयावर डॉ. धाटावकर बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. धाटावकर म्हणाले, इतिहास हा वस्तुनिष्ठ असला पाहिजे. इतिहास ही राष्ट्राची स्मृती आहे. त्यामुळे इतिहास हा सोयीचा आणि आपल्याला आवडेल तसा लिहिणे चुकीचे आहे. यासाठी अभिलेख पाहण्याची संशोधकांची मानसिकता असली पाहिजे. ऐतिहासिक दस्तऐवजांनी अभिलेखकांनी संशोधकाशी संवाद साधल्यासारखा सूक्ष्म अभ्यास आणि पडताळणी करायला हवी.

कुलगुरू डॉ. शिंदे अध्यक्षीय भाषणात म्हणाले, यश हजारोंतून अधिक मोठी हस्तलिखितांचा ठेवा जतन करणे ही चांगली गोष्ट आहे. तत्त्वाचा शोध आणि बोध घेण्यासाठी मॅन्युस्क्रीप्ट रिसोर्स सेंटर हे महत्त्वाचे साधन आहे.

कार्यक्रमास बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, डॉ. आर. के. कामत, डॉ. अरुण भोसले, सहायक संचालक डॉ. पी. बी. बिलावर आदी उपस्थित होते. संचालन नमिता खोत यांनी, स्वागत, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी पाहुण्यांचा परिचय तर कॉन्सर्वेशनिस्ट शफिक देसाई यांनी आभार मानले.

पुढारी
4 JUL 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यापीठाचे विद्यार्थी होणार आणखी 'स्मार्ट'

- मोबाईलवरून शैक्षणिक प्रक्रियेची सुविधा
- प्रायोगिक तत्त्वावर कार्यप्रणालीची चाचपणी
- अडीच लाख विद्यार्थ्यांच्या वेळेची आणि पैशाची बचत
- जगाच्या कानाकोपऱ्यातील माजी विद्यार्थ्यांचीही सोय

कोल्हापूर : विजय पाटील

शिवाजी विद्यापीठ आता खऱ्या अर्थी डिजिटलकडे वाटचाल करत आहे. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हा कार्यक्षेत्र असणाऱ्या या विद्यापीठातील पुढील अडीच लाख विद्यार्थ्यांना डिजिटल स्मार्ट करण्ये आणत आहे. यामुळे सर्व शैक्षणिक प्रक्रिया या मोबाईलवरून सहजपणे करता यावयास पालकांसाठीची कार्यप्रणाली विकसित करण्यात आली आहे. सध्या याचाच प्रायोगिक तत्त्वावर काम सुरू असून आगामी काळात सरसकट हा उपक्रम राबवला जाणार आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे तीन जिल्ह्यांचे आहे. बहुतांश ग्रामीण पार्श्वभूमी असलेले विद्यार्थी विद्यापीठाशी संलग्न आहेत. या तीन जिल्ह्यांतील ३८० महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्न आहेत. आर्ट्स, कॉमर्स, सायन्स आणीसह इंजिनिअरिंग, एम्. बी.ए.एम्. आदींसह व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या यामध्ये समावेश आहे. या माध्यमातून अडीच लाख विद्यार्थी विद्यापीठामार्फत शैक्षणिक प्रवाहात आहेत. प्रवेश असोत किंवा अगदी कॉन्फ्रीकेशन फॉर्म की भरायचाचा असोत या बाबतचा डी. डी. काढून त्यासाठी थेटच विद्यार्थ्यांना विद्यापीठात यावे लागते. सोबत विविध अर्ज भरावे लागतात. या साऱ्या गोष्टींसाठी सांगली, सातारा-यातील एखाद्या दूरच्या गावातील विद्यार्थी व त्यांचे पालक यात नाहक भरडले जातात. कारण वेळ, पैसा आणि श्रम या तीनही घटकांच्या पोटीच अपव्यय होतो. ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या दृष्टीने या गोष्टी फारशा न्यायाच्या नसतात. या साऱ्या गोष्टींचा आता विद्यार्थ्यांच्या पर्यायाने विद्यापीठाच्या माध्यमातून उपयोग केला जाणार आहे. या अभिनवीन सुविधेमुळे जगभरात विद्यापीठाच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाशी कनेक्ट राहता येणार आहे. कोल्हापूरी गावातील विद्यार्थी असलेल्या तरी मोबाईलवरून त्यांना आता शैक्षणिक प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. सगळा एखाद्याकडे मोबाईल नसेल किंवा असलेल्या तरी इंटरनेटची सुविधा नसावी तरी पालक किंवा दुसऱ्यांच्या मोबाईलवरूनही ही प्रक्रिया पूर्ण करता येऊ शकणार आहे. 'पेमेंट गेटवे', असे या अभिनवीन सुविधेचे नाव आहे. सगळीही विद्यापीठाने या सुविधेची भरपाई केली होती. मात्र ती कार्यान्वित करण्यात अडचण येत होती. आता मात्र प्रायोगिक तत्त्वावर त्याचा वेगे सुरू आहे. ही प्रक्रिया आता यशस्वी होऊन विद्यार्थ्यांना अभिनवीन सुविधा देण्यात विद्यापीठ एक पाऊल पुढे टाकेल, असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त केला जात आहे.